रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे -४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१
मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in

निवडणूक प्राधान्य

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/बाजार समिती/ 2956/२०२३
दिनांक :- 29/०३/२०२३

वाचावे :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. या प्राधिकरणाकडील आदेश क्रमांक रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया सुरु करणे/६७७८/२०२२, दिनांक ०६.०९.२०२२

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ३६१३/२०२२ मध्ये दाखल दिवाणी अर्ज क्रमांक २८५०/२०२२ मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २१.१२.२०२२

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १५७७२/२०२२ मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २२.१२.२०२२

५. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक १३३१३/२०२२ व इतर संलग्न याचीकां मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २२.१२.२०२२

६. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया पूढे ढकलणे/९३७१/२०२२, दिनांक २२.१२.२०२२

७. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ३६१३/२०२२ व इतर संलग्न ४३ याचिकांमध्ये पारीत केलेले अंतरीम आदेश दिनांक ५.०१.२०२३.

८. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/बाजार समिती/१०६३/२०२३, दिनांक ८.२.२०२३

९. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १५.०३.२०२३

प्रस्तावना

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार राज्यातील दिनांक ३१.१२.२०२२ अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे बाबत जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना आदेशीत केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी प्राधिकरणाकडील वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार २४९ कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता अंतिम मतदार याद्या प्रसिध्द केलेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाकडील वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता नामनिर्देशनाची प्रक्रिया दिनांक २३.१२.२०२२ पासून सुरू होणार होती. मात्र अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नव्याने निवडून आलेले प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था सदस्य, बहुउद्देशीय

Scanned with CamScanner

सहकारी संस्था सदस्य व ग्रामपंचायत सदस्य यांना अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याची तरतुद प्रचलित निवडणूक नियमात नसल्यामुळे प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेणे संदर्भात मोठया प्रमाणात याचिका मा. उच्च न्यायालय मुंबई, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झाल्या असता मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, मा. उच्च न्यायालय मुंबई व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी वाचावे क्रमांक ३,४ व ५ च्या आदेशानुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा निवडणूक कार्यक्रम अनुक्रमे दिनांक ३.१.२०२३, दिनांक ६.१.२०२३ व दिनांक ९.१.२०२३ पर्यंत पुढे (defer) ढकललेला आहे. आणि,

ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालयाकडील वाचावे क्रमांक ३ च्या आदेशामुळे प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ६ चे आदेश पारीत करुन ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता अंतिम मतदार यादया प्रसिध्द झालेल्या आहेत व प्रसिध्द होणार आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा निवडणूक कार्यक्रम दिनांक ३.१.२०२३ पर्यंत पुढे (defer) ढकललेला आहे. आणि,

ज्या अर्थी, नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना बाजार समितीच्या निवडणूकीत सहभागी करुन घेण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी वाचावे क्रमांक ७ चे अंतरीम आदेश पारीत करून राज्यातील निवडणूकीस पात्र सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३०.०४.२०२३ पर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण करण्यास मुदतवाढ दिलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ८ च्या आदेशानुसार दिनांक १.०९.२०२२ नंतर निवडून आलेल्या प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था, बहुद्देशीय सहकारी संस्था (ज्या त्यांच्या सदस्यांना पीक कर्ज संवितरीत करतात अशा संस्था) व ग्रामपंचायत सदस्यांची नावे कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी अंतिम केलेल्या मतदार यादीमध्ये महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ७ (५) मधील तरतुदीनुसार समाविष्ट करण्याकरीता अंतिम मतदार यादी सुधारणा कार्यक्रमास मान्यता दिलेली आहे. सदर कार्यक्रमानुसार सुधारीत अंतिम मतदार यादी दिनांक [illegible].२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या आहेत किंवा प्रसिद्ध होणार आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ७ ([illegible]) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समितींच्या निवडणूका सुरळीपणे व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, प्राधिकरण निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता निवडणूक कार्यक्रम सुरू करणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन प्राधिकरण निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता निवडणूक कार्यक्रम सुरू करणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता दिनांक १.९.२०२२ या अर्हता दिनांकावर प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादयांमध्ये सुधारणा होऊन **सुधारीत अंतिम मतदार यादया** प्रसिद्ध होणार आहेत/झालेल्या आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया या आदेशासोबत

Scanned with CamScanner

जोडलेल्या **परिशिष्ट १** अथवा **परिशिष्ट २** मधील एका निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे दिनांक २७.०३.२०२३ पासून सुरू करावी.

२. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता दिनांक १.१.२०२३ व दिनांक १.२.२०२३ या अर्हता दिनांकावर **अंतीम मतदार यादया** प्रसिद्ध होणार आहेत/झालेल्या आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया या आदेशासोबत जोडलेल्या **परिशिष्ट १** अथवा **परिशिष्ट २** मधील एका निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे दिनांक २७.०३.२०२३ पासून सुरू करावी.

३. जिल्हयाच्या ठिकाणी कार्यरत कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया **परिशिष्ट १** मधील निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे पूर्ण करावी.

४. तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया **परिशिष्ट १** अथवा **परिशिष्ट २** मधील एका निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे पूर्ण करावी. एकाच तालुक्यात एका पेक्षा जास्त कृषि उत्पन्न बाजार समित्या निवडणूकीस पात्र असल्यास सदर बाजार समित्यांची मतदान व मतमोजणीची प्रक्रिया वेगवेगळया दिनांकास पार पाडावी.

५. निवडणूक प्रक्रिया सुरु न करणेबाबत मा.न्यायालयाचे विशिष्ट कृषि उत्पन्न बाजार समिती संदर्भात आदेश असल्यास अशा कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरु करु नये.

६. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी **परिशिष्ट १** अथवा **परिशिष्ट २** मधील एक निवडणूक कार्यक्रम तयार करुन निवडणूक कार्यक्रमास महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम १८ मधील तरतुदीप्रमाणे प्राधिकरणाची मान्यता घेणे बाबतचे प्रस्ताव जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्यामार्फत प्राधिकरणास या आदेशानंतर तात्काळ सादर करावेत.

७. मान्यता प्राप्त निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावा व कमीत कमी आकाराच्या संक्षिप्त मतदार यादी कार्यक्रमास बाजार समितीच्या बाजार क्षेत्रातील जास्त खपाच्या एकाच स्थानिक वर्तमान पत्रात शासन मान्य दराने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

८. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ मध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा विचारात घेऊन कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडावी.

९. कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता राज्य शासनाच्या किंवा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पात्र व योग्य अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा अधिग्रहित करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (संबंधीत)
२. निवडणूक निर्णय अधिकारी (संबंधित)
३. निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक (संबंधित)

**प्रत महितीस्तव :-**

१. मा. अपर मुख्य सचिव (पणन) सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with CamScanner

(या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. 29146/२०२३ दिनांक 27.०३.२०२३ रोजीच्या आदेशासोबत जोडलेले परिशिष्ट)

परिशिष्ट १

निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम जाहिर करणे | २७.३.२०२३ |
| २. | नामनिर्देशन करण्याचा शेवटचा दिनांक | २७.३.२०२३ ते ०३.०४.२०२३ |
| ३. | मिळालेल्या नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे |
| ४. | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | ०५.०४.२०२३ |
| ५. | छाननीनंतर वैध नामनिर्देशनपत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक | ६.०४.२०२३ |
| ६. | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक | ०६.०४.२०२३ ते २०.०४.२०२३ |
| ७. | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा व निशाण्याचे वाटप करण्याचा दिनांक | २१.०४.२०२३ |
| ८. | मतदान | २८.०४.२०२३ |
| ९. | मतमोजणी | मतदान दिनांकापासून तीन दिवसांच्या आत |
| १०. | निकाल जाहिर करणे | मतमोजणी नंतर लगेचच |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned with CamScanner